**RNI No. MAHBIL /2009/35530**

**Reg. No. MH/MR/South-341/2011-13**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष ५, अंक १२] सोमवार, जुलै १, २०१३/आषाढ १०, शके १९३५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक २३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**—मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ निरसित करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-६ |

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २०१३.

### MAHARASHTRA ORDINANCE No. XI 2013.

AN ORDINANCE

TO REPEAL THE CITY OF MUMBAI PRIMARY EDUCATION ACT, THE MAHARASHTRA PRIMARY EDUCATION ACT, THE HYDERABAD COMPULSORY PRIMARY EDUCATION ACT, 1952 AND THE MADHYA PRADESH PRIMARY EDUCATION ACT, 1956 AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**

**मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ निरसित करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी** प्राथमिक शिक्षणाचा विकास व प्रसार सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ हे अधिनियमित करण्यात आले असून ते महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित क्षेत्रांमध्ये लागू करण्यात आले आहेत ; १९२० चा १५. १९४७ चा ६१. १९५२ चा हैद्राबाद ४०. १९५६ चा म. प्र. २३.

**आणि ज्याअर्थी** उक्त अधिनियमांच्या तरतुदींमध्ये एकरुपता नाही ;

**आणि ज्याअर्थी** भारताच्या संविधानामध्ये, संविधान (शह्याऐंशीवी सुधारणा) अधिनियम, २००२ याद्वारे सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मूलभूत हक्क म्हणून मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्याकरिता अनुच्छेद २१ क समाविष्ट करण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी** उक्त सांविधानिक सुधारणेची अंमलबजावणी करण्याकरिता भारत सरकारने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ हा अधिनियमित केला असून, तो दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणलेला आहे ; २००९ चा ३५.

**आणि ज्याअर्थी** उक्त केंद्रीय अधिनियमामुळे उक्त राज्य अधिनियमांच्या काही तरतुदी निरर्थक झालेल्या आहेत ;

**आणि ज्याअर्थी** महाराष्ट्र राज्यामध्ये प्राथमिक शिक्षण पद्धतीमध्ये एकरुपता आणण्याच्या आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या हेतूने, शासनाला उक्त राज्य अधिनियमांचे निरसन करणे इष्ट वाटते ; २००९ चा ३५.

**आणि ज्याअर्थी** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ हे निरसित करण्यासाठी व तत्संबधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; १९२० चा १५. १९४७ चा ६१. १९५२ चा हैद्राबाद ४०. १९५६ चा म.प्र. २३.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अध्यादेश, २०१३ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अध्यादेशात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ख) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

(एक) महानगरपालिकेने चालविलेल्या शाळांच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, यांअन्वये घटित केलेली महानगरपालिका ; १८८८ चा ३. १९४९ चा ५९.

(दोन) जिल्हा परिषदेने चालविलेल्या शाळांच्या संबंधात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद ; १९६२ चा महा. ५.

(तीन) नगर परिषद, नगरपंचायत किंवा, यथास्थिति, औद्योगिक नगरी यांनी चालविलेल्या शाळांच्या संबंधात, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेली नगरपरिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी ;

१९६५ चा महा. ४०.

(चार) अन्य कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरण म्हणून समजले जाणारे अन्य कोणतेही प्राधिकरण,

असा आहे ;

(ग) " निरसित अधिनियम " याचा अर्थ, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६, असा आहे.

१९२० चा १५. १९४७ चा ६१. १९५२ चा हैद्राबाद ४०. १९५६ चा म. प्र. २३.

(२) या अध्यादेशात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना निरसित अधिनियमांमध्ये जे अर्थ अनुक्रमे नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

२०१३ चा महा. अध्या. ११.

सन १९२० चा अधिनियम क्रमांक १५, सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ६१, सन १९५२ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ४० व सन १९५६ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक २३ यांचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अध्यादेश, २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभानंतर,—

१९२० चा १५. १९४७ चा ६१ १९५२ चा हैद्राबाद ४०. १९५६ चा म. प्र. २३.

(क) मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम ;

(ख) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम ;

(ग) हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ ; आणि

(घ) मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६,

निरसित होतील.

(२) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून,—

(क) निरसित अधिनियमांन्वये व त्याखाली केलेल्या नियमांन्वये घटित केलेली शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे विसर्जित होतील आणि त्यांचे सदस्य आपली पदे रिक्त करतील ;

(ख) संबंधित स्थानिक प्राधिकरणाला, अशा प्राधिकरणाच्या आवश्यकतेप्रमाणे व त्यांना लागू असलेल्या कायद्याच्या तरतुदींनुसार, शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे घटित करता येतील ;

(ग) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, शाळा मंडळे व स्थानिक समित्या यांच्याकडे निहित असलेल्या सर्व जंगम व स्थावर मालमत्ता, आणि त्यामध्ये असलेले कोणत्याही स्वरुपाचे व प्रकारचे हितसंबंध हे, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या किंवा अस्तित्वात असलेल्या सर्व मर्यादा व शर्ती आणि कोणतीही व्यक्ती, मंडळ किंवा प्राधिकरण यांचे हक्क किंवा हितसंबंध यांना अधीन राहून, संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित केले असल्याचे मानण्यात येईल आणि ते संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे निहित होतील ;

(घ) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, शाळा मंडळे व स्थानिक समित्या यांनी घेतलेली आणि अशी कोणतीही शाळा मंडळे व स्थानिक समित्या यांच्या नावे कायदेशीररित्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व आबंधने, संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून चुकती करण्यात येतील व त्यांची पूर्तता करण्यात येईल ;

(ङ) उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, शाळा मंडळे व स्थानिक समित्या यांच्या सेवेत असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला संबंधित स्थानिक प्राधिकरणामध्ये हस्तांतरित करण्यात येईल, आणि अशा कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवेच्या विद्यमान अटी व शर्ती या, स्थानिक प्राधिकरणाकडून त्यात यथोचितरीत्या फेरबदल किंवा सुधारणा करण्यात येईपर्यंत तशाच पुढे सुरू राहतील :

परंतु, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा कर्मचाऱ्याला लागू असलेल्या सेवेच्या शर्तींमध्ये त्याचे नुकसान होईल अशा रीतीने बदल करण्यात येणार नाहीत ;

(च) निरसित अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या शाळांमधील आणि वेळोवेळी काढलेल्या शासकीय आदेशानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवेच्या विद्यमान अटी व शर्ती या, शासनाकडून अशा शर्तींमध्ये यथोचितरीत्या फेरबदल केला जाईपर्यंत किंवा त्यात सुधारणा केली जाईपर्यंत, विद्यमान शासकीय धोरणानुसार पुढे चालू राहतील :

परंतु, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा कर्मचाऱ्याला लागू असलेल्या सेवेच्या शर्तींमध्ये त्याचे नुकसान होईल अशा रीतीने बदल करण्यात येणार नाहीत ;

(छ) निरसित अधिनियमांन्वये व त्यांखाली केलेल्या नियमांन्वये, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या संचालक, सहसंचालक, उप संचालक, शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, अशा सारख्या अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या कर्तव्यांसह त्यांची रचना ही, शासनाकडून त्यामध्ये यथोचितरीत्या फेरबदल किंवा सुधारणा केली जाईपर्यंत तशीच सुरू राहील ;

(ज) निरसित अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या शाळांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना, देय असलेला भविष्यनिर्वाह निधी, उपदान, निवृत्तिवेतन व इतर लाभ निरसित अधिनियमांखालील व त्यांखाली केलेल्या नियमान्वये विद्यमान धोरणानुसार संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून चालू ठेवण्यात येतील व त्यांना प्रदान करण्यात येतील ;

(झ) निरसित अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या शाळांना देय असलेली अनुदाने व भाडे, शासनाकडून विद्यमान धोरणात यथोचित फेरबदल किंवा सुधारणा करण्यात येईपर्यंत, निरसित अधिनियमांखालील व त्याअन्वये केलेल्या नियमांखालील विद्यमान धोरणानुसार, शासनाकडून देण्यात येतील ;

(ञ) निरसित अधिनियमांन्वये ठेवलेला प्राथमिक शिक्षण निधी, संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित होईल ;

(ट) स्थानिक प्राधिकरणांना लागू असलेल्या कायद्याच्या तरतुदींनुसार त्यांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या संबंधात, संबंधित स्थानिक प्राधिकरण हे अर्थसंकल्प तयार करील ;

(ठ) महानगरपालिकेने चालविलेल्या शाळांच्या संबंधातील अधीक्षण, तपासणी व नियंत्रण, यांचे अधिकार हे, संबंधित महानगरपालिका आयुक्ताकडे व त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर दुय्यम अधिकाऱ्यांकडे असतील ; आणि नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी आणि जिल्हा परिषदा यांनी चालविलेल्या शाळांच्या संबंधात असे अधिकार हे, संबंधित मुख्य अधिकाऱ्याकडे किंवा यथास्थिति मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे व त्याने प्राधिकृत केलेल्या इतर दुय्यम अधिकाऱ्यांकडे असतील ;

(ड) शाळांची स्थापना, अभ्यासक्रम, परीक्षा, प्रशासन व इतर संबंधित बाबी या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींना अधीन असतील ; २००९ चा ३५.

(ढ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे उक्त अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी निरसित केलेल्या अधिनियमांच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या संबंधात शासनाने दिलेले सर्व निदेश किंवा आदेश हे, शासनाने त्यात फेरबदल, सुधारणा किंवा ते रद्द केल्याखेरीज पुढे अंमलात आणि लागू राहतील ; २००९ चा ३५.

(ण) निरसित अधिनियमांखालील कोणत्याही प्राधिकरणासमोर, सेवाशर्तींच्या संबंधात दाखल केलेली व प्रलंबित असलेली निरसित अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या शाळांच्या कर्मचाऱ्यांची सर्व अपीले, शासनाकडून नवीन प्राधिकरण स्थापन केले जाईपर्यंत, अशा प्राधिकरणापुढे सुरू राहतील व ती त्याच्याकडून निकालात काढण्यात येतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये अधिनियमांच्या निरसनाचा पुढील बाबींवर परिणाम होणार नाही,—

(क) निरसित अधिनियमांच्या पूर्वीची कार्ये किंवा त्याखाली यथोचितरीत्या केलेल्या किंवा होऊ दिलेल्या कोणत्याही बाबी ;

(ख) निरसित अधिनियमांखाली संपादित केलेला, प्रोदभूत झालेला किंवा पत्करलेला कोणताही करार, संविदा, अधिकार, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व ;

(ग) निरसित अधिनियमांखाली केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात, लादलेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती किंवा शिक्षा ;

(घ) उपरोक्तप्रमाणे असा कोणताही करार, संविदा, अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांबाबत करण्यात आलेले कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही अथवा उपाय ; आणि जणू काही हे निरसित अधिनियम निरसित करण्यात आलेले नव्हते असे समजून, असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही अथवा उपाय करता येतील, पुढे चालू ठेवता येतील किंवा अंमलात आणता येतील ;

(ङ) शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार शाळा मंडळे व स्थानिक समित्या यांनी केलेल्या कोणत्याही नेमणुका ; आणि

२००९ चा ३५. (च) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींना अधीन राहून, निरसित अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या शाळा.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " शाळा मंडळे व स्थानिक समित्या " या शब्दप्रयोगाचा अर्थ, पोट-कलम (२) च्या खंड (क) अन्वये विसर्जित केलेली मंडळे व समित्या, असा आहे.

(४) या अध्यादेशात अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून, निरसनाच्या परिणामाबाबत, महाराष्ट्र
१९०४ चा १. सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम याच्या कलम ७ च्या तरतुदी लागू होतील.

निदेश देण्याचा अधिकार.

**४.** राज्य शासनास, या अध्यादेशाच्या कलम ३ च्या तरतुदींबाबत स्थानिक प्राधिकरणासाठी वेळोवेळी
२००९ चा ३५. त्याला योग्य वाटतील अशी, आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशी मार्गदर्शक तत्त्वे घालून देता येतील आणि असे निदेश देता येतील.

शंका किंवा अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही शंका किंवा अडचण उद्भवल्यास, शासनास राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे प्रसंगानुरूप, ती शंका किंवा अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## निवेदन

प्राथमिक शिक्षणाचा विकास आणि प्रसार सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, विविध अधिनियम अधिनियमित करून ते महाराष्ट्र राज्यातील विवक्षित क्षेत्रांमध्ये लागू केलेले आहेत. मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम (१९२० चा १५) हा बृहन्मुंबई क्षेत्रास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम (१९४७ चा ६१) हा बृहन्मुंबई, मराठवाडा व विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्र क्षेत्रास, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ ( १९५२ चा हैद्राबाद ४०) हा मराठवाडा क्षेत्रास आणि मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ (१९५६ चा म.प्र.२३) हा विदर्भ क्षेत्रास लागू आहे. उक्त अधिनियमांच्या तरतुदींमध्ये एकरुपता नाही.

२. भारत सरकारने सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व मुलांना मूलभूत अधिकार म्हणून मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने, संविधान (शह्याऐंशीवी सुधारणा) अधिनियम, २००२ याद्वारे भारताच्या संविधानामध्ये अनुच्छेद २१ क समाविष्ट केला आहे. उक्त सांविधानिक सुधारणेची अंमलबजावणी करण्याकरिता, भारत सरकारने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (२००९ चा ३५) हा अधिनियमित केला असून तो दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणलेला आहे. या केंद्रीय अधिनियमामध्ये बालकांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याच्या अधिकाराबाबत तसेच राज्य शासनाची व स्थानिक प्राधिकरणांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांबाबत परिपूर्ण तरतुदी केल्या आहेत. उक्त केंद्रीय अधिनियमात इतर गोष्टींबरोबरच, शाळांची मान्यता, शिक्षकांच्या नियुक्तीकरिता अर्हता व त्यांच्या सेवेच्या शर्ती, विद्यार्थी-शिक्षक प्रमाण, अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया, गाऱ्हाण्यांचे निवारण आणि राज्य सल्लागार परिषद स्थापन करणे यांबाबतची मानके व प्रमाणके नमूद केलेली आहेत.

३. उक्त केंद्रीय अधिनियम विचारात घेता, उक्त राज्य अधिनियमांच्या काही तरतुदी निरर्थक झालेल्या आहेत. म्हणून, प्राथमिक शिक्षण पद्धतीमध्ये एकरुपता आणण्याकरिता आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींची महाराष्ट्र राज्यात काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या हेतुने, उक्त राज्य अधिनियमांचे निरसन व त्यातील विशिष्ट बाबींची व्यावृत्ती करणे शासनास इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम (१९२० चा १५), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम (१९४७ चा ६१), हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५२ (१९५२ चा हैद्राबाद ४०) आणि मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५६ (१९५६ चा म.प्र. २३), हे अधिनियम निरसित करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,

दिनांक ३० जून २०१३.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

Reg. No. MH/MR/South-344/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक २१] सोमवार, जुलै १, २०१३/आषाढ १०, शके १९३५ [ पृष्ठे ७, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३६

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the City of Mumbai Primary Education, the Maharashtra Primary Education, the Hyderabad Compulsory Primary Education and the Madhya Pradesh Primary Education (Repeal) Ordinance, 2013 (Mah. XI of 2013), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the City of Mumbai Primary Education, the Maharashtra Primary Education, the Hyderabad Compulsory Primary Education and the Madhya Pradesh Primary Education (Repeal) Ordinance, 2013 (Mah. Ord. XI of 2013), published under the authority of the Governor).

---

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st July 2013.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2013.

*AN ORDINANCE*

*to repeal the City of Mumbai Primary Education Act, the Maharashtra Primary Education Act, the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 and the Madhya Pradesh Primary Education Act, 1956 and to provide for matters connected therewith or incidental thereto.*

WHEREAS for the purposes of securing development and
XV of 1920. expansion of primary education, the City of Mumbai Primary
LXI of 1947. Education Act, the Maharashtra Primary Education Act, the
Hyd. XL of 1952. Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 and the
M.P. XXIII of 1956. Madhya Pradesh Primary Education Act, 1956 have been enacted and made applicable in certain areas of the State of Maharashtra;

AND WHEREAS there is no uniformity in the provisions of the said Acts;

AND WHEREAS by the Constitution (Eighty-sixth Amendment) Act, 2002 article 21A has been inserted in the Constitution of India which provides for free and compulsory education to all children of the age of six to fourteen years as a fundamental right;

AND WHEREAS to give effect to the said Constitutional Amendment, the Government of India has enacted the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 which has been brought into force with effect from the 1st April 2010 ; 35 of 2009.

AND WHEREAS some of the provisions of the said State Acts have become void in view of the said Central Act;

AND WHEREAS with a view to have uniformity in the primary education system and strict implementation of the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 in the State of Maharashtra, the Government considers it expedient to repeal the said State Acts ; 35 of 2009.

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to repeal the City of Mumbai Primary Education Act, the Maharashtra Primary Education Act, the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 and the Madhya Pradesh Primary Education Act, 1956 and to provide for the matters connected therewith or incidental thereto, for the purposes hereinafter appearing; XV of 1920. LXI of 1947. Hyd. XL of 1952. M.P. XXIII of 1956.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement. **1.** (*1*) This Ordinance may be called the City of Mumbai Primary Education, the Maharashtra Primary Education, the Hyderabad Compulsory Primary Education, and the Madhya Pradesh Primary Education (Repeal) Ordinance, 2013.

(2) It shall come into force at once.

Definitions. **2.** (*1*) In this Ordinance, unless the context otherwise requires,—

(*a*) "Government" means the Government of Maharashtra;

(*b*) "local authority" means,—

(*i*) in relation to the schools managed by a Municipal Corporation, the Municipal Corporation constituted under the Mumbai Municipal Corporation Act or, as the case may be, the Maharashtra Municipal Corporations Act; III of 1888. LIX of 1949.

(*ii*) in relation to the schools managed by a *Zilla Parishad,* the *Zilla Parishad* constituted under the Maharashtra *Zilla Parishads* and Panchayat Samitis Act, 1961; Mah. V of 1962.

(*iii*) in relation to the schools managed by the Municipal Council, *Nagar Panchayat* or, as the case may be, Industrial Township, the Municipal Council, *Nagar Panchayat* or Industrial Township constituted under the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965; Mah. XL of 1965.

(*iv*) any other authority treated as local authority under any other law;

XV of 1920. LXI of 1947. Hyd. XL of 1952. M.P. XXIII of 1956.

(*c*) "repealed Acts" means the City of Mumbai Primary Education Act, the Maharashtra Primary Education Act, the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 and the Madhya Pradesh Primary Education Act, 1956.

(2) Words and expressions used in this Ordinance but not defined, shall have the meanings respectively assigned to them in the repealed Acts.

Repeal of XV of 1920, LXI of 1947, Hyd. XL of 1952 and M.P. XXIII of 1956 and savings.

Mah. Ord. of 2013 XI.

**3.** (*1*) On the commencement of the City of Mumbai Primary Education, the Maharashtra Primary Education, the Hyderabad Compulsory Primary Education, and the Madhya Pradesh Primary Education (Repeal) Ordinance, 2013 (hereinafter referred to as "the said Ordinance"),—

XV of 1920. LXI of 1947. Hyd. XL of 1952. M.P. XXIII of 1956.

(*a*) the City of Mumbai Primary Education Act;

(*b*) the Maharashtra Primary Education Act;

(c) the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952; and

(*d*) the Madhya Pradesh Primary Education Act, 1956, shall stand repealed.

(*2*) On and from the date of commencement of the said Ordinance,—

(*a*) the School Boards, Local Committees or any other Committees or Boards constituted under the repealed Acts and the rules made thereunder, shall stand dissolved and the members shall vacate their offices ;

(*b*) the concerned local authority may constitute School Boards, Local Committees or any other Committees or Boards as per their requirements and in accordance with the provisions of the law applicable to such local authority ;

(*c*) all properties movable and immovable, and interests of whatever nature and kind therein, vested in the School Boards and Local Committees, immediately before the commencement of the said Ordinance shall be deemed to be transferred to, and shall vest in the concerned local authority subject to all limitations and conditions and rights or interests of any person, body or authority in force or subsisting immediately prior to such commencement;

(*d*) all debts, liabilities and obligations incurred by School Boards and Local Committees, immediately before the commencement of the said Ordinance and lawfully subsisting against any such School Boards and Local Committees shall be discharged and satisfied by the concerned local authority;

(*e*) every employee serving under the School Boards and Local Committees, immediately before the commencement of the said Ordinance shall stand transferred to the concerned local authority, and the salaries and existing terms and conditions of service of such employee shall continue until duly altered or modified by the local authority :

Provided that, the conditions of service applicable to such employee immediately before the commencement of the said Ordinance shall not be varied to his disadvantage;

(*f*) the salaries and existing terms and conditions of service of the teaching and non-teaching employees of the schools established under the repealed Acts and appointed as per the Government orders, issued from time to time, shall be continued as per the existing Government policy until duly altered or modified by the Government:

Provided that, the conditions of service applicable to such employee immediately before the commencement of the said Ordinance shall not be varied to his disadvantage;

(*g*) the setup of the officers conferred with duties under the repealed Acts and rules made thereunder such as Director, Joint Director, Deputy Director, Education Officer, Deputy Education Officer and the like, appointed by the State Government, shall be continued until duly altered or modified by the Government;

*(h)* the Provident Fund, Gratuity, Pension and other benefits payable to the teaching and non-teaching employees of schools established under the repealed Acts, shall be maintained and paid by the concerned local authority as per the existing policy under the repealed Acts and the rules made thereunder ;

(*i*) the grants and rent payable to the schools established under the repealed Acts shall be paid by the Government as per the existing policy under the repealed Acts and the rules made thereunder until duly altered or modified by the Government;

(*j*) the Primary Education Fund maintained under the repealed Acts, shall stand transferred to the concerned local authority;

(*k*) the concerned local authority shall prepare the Budget in respect of the schools run by it in accordance with the provisions of the law applicable to such local authority;

(*l*) the powers of superintendence, inspection and control, in respect of the schools run by the Municipal Corporations shall be with the concerned Municipal Commissioner and other sub-ordinate officers authorized by him in that behalf; and in respect of the schools run by the Municipal Councils, *Nagar Panchayats*, Industrial Townships, and the *Zilla Parishads* such powers shall be with the concerned Chief Officer or, as the case may be, the Chief Executive Officer and other sub-ordinate officers authorized by him in that behalf;

(*m*) the establishment of schools, syllabus, examinations, administration and all related matters shall be subject to the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009; 35 of 2009.

(*n*) all directions or orders issued by the Government in respect of the repealed Acts and the rules made thereunder before the commencement of the said Ordinance, not inconsistent with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, shall be continued and applicable, unless altered, modified or revoked by the Government; 35 of 2009.

(*o*) all appeals of employees of the schools established under the repealed Acts relating to the service conditions filed and pending before any authority under the repealed Acts, shall be continued and disposed of by such authority, until a new authority is established by the Government.

(*3*) The repeal of the Acts under sub-section (*1*) shall not affect—

(*a*) the previous operation of the repealed Acts or anything duly done or suffered thereunder ;

(*b*) any agreement, contract, right, privilege, obligation or liability acquired, accrued or incurred under the repealed Acts;

(*c*) any penalty, forfeiture or punishment incurred in respect of any offence committed under the repealed Acts;

(*d*) any investigation, legal proceedings or remedy in respect of any such agreement, contract, right, privilege, obligation, liability, penalty, forfeiture or punishment as aforesaid; and any such investigation, legal proceedings or remedy may be instituted, continued or enforced and any such investigation, legal proceedings or remedy may be imposed, as if the repealed Acts had not been repealed;

(*e*) any appointments made by the School Boards and Local Committees, as per the Government orders, issued from time to time ; and

(*f*) subject to the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, the schools established under the repealed Acts. 35 of 2009.

*Explanation.*—For the purposes of this section, the expressions "School Boards and Local Committees" means the Boards and Committees dissolved under clause *(a)* of sub-section(*2*).

*(4)* Save as otherwise provided in this Ordinance, the provisions of section 7 of the Maharashtra General Clauses Act, with regard to effect of repeal, shall apply. I of 1904.

**4.** The State Government may, from time to time, issue such guidelines and give such directions not inconsistent with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, as it deems fit, to the local authority regarding the provisions of section 3 of this Ordinance. Power to issue directions. 35 of 2009.

Power to remove doubt or difficulties.

5. (*1*) If any doubt or difficulty arises in giving effect to the provisions of this Ordinance, the Government may, as occasion arises, by an order, published in the *Official Gazette,* do anything, not inconsistent with the provisions of this Ordinance, which appears to it to be necessary or expedient for the purposes of removing the doubt or difficulty.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

## STATEMENT

For the purposes of securing development and expansion of primary education, different Acts have been enacted and made applicable in certain areas in the State of Maharashtra. The City of Mumbai Primary Education Act (XV of 1920) is made applicable to the area of Brihan Mumbai, the Maharashtra Primary Education Act (LXI of 1947) to the area of rest of Maharashtra excluding Brihan Mumbai, Marathwada and Vidarbha, the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 (Hyd. XL of 1952) to the area of Marathwada and the Madhya Pradesh Primary Education Act, 1956 (M. P. XXIII of 1956) to the area of Vidarbha. There is no uniformity in the provisions of the said Acts.

**2.** The Government of India has by the Constitution (Eighty-sixth Amendment) Act, 2002 inserted article 21A in the Constitution of India, which provides for free and compulsory education to all children of the age of six to fourteen years as a fundamental right. With a view to give effect to the said Constitutional Amendment, the Government of India has enacted the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (35 of 2009), which has been brought into force with effect from the 1st April 2010. The Central Act contains exhaustive provisions regarding the right of children to free and compulsory education till the completion of elementary education, as well as the duties and responsibilities of the State Government and local authorities. The said Central Act, *inter alia,* provides for the norms and standards for recognition of schools, qualifications for appointment of teachers and their service conditions, pupil-teacher ratio, curriculum and evaluation procedure, redressal of grievances and constitution of the State Advisory Council.

**3.** In view of the said Central Act, some of the provisions of the said State Acts have become void. Therefore, with a view to have uniformity in the primary education system and strict implementation of the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 in the State of Maharashtra, the Government considers it expedient to repeal the said State Acts, with specific savings.

**4.** As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to repeal the City of Mumbai Primary Education Act ( XV of 1920), the Maharashtra Primary Education Act (LXI of 1947), the Hyderabad Compulsory Primary Education Act, 1952 (Hyd. XL of 1952) and the Madhya Pradesh Primary Education Act, 1956 (M. P. XXIII of 1956), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai, K. SANKARANARAYANAN,

Dated the 30th June 2013. Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. S. SAHARIA,

Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.